शनिवार, दि. २९ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २३६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## राज्यातील ६४ लाख शेतकऱ्यांना मिळणार रु. २५५५ कोटी विमा नुकसान भरपाई

### कृषी मंत्री ॲड कोकाटे

**मुंबई** - राज्यातील तब्बल ६४ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून, त्यांच्या खात्यावर थेट रु. २५५५ कोटी विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून रु. २८५२ कोटी वितरित करण्यास मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे मागील विविध हंगामांतील प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा होणार आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना विमा कंपन्यांना देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

या अंतर्गत खरीप २०२२ आणि रब्बी २०२२-२३ या हंगामांसाठी रु. २.८७ कोटी, खरीप २०२३ साठी रु. १८१ कोटी, रब्बी २०२३-२४ साठी रु. ६३.१४ कोटी आणि खरीप २०२४ साठी रु. २३०८ कोटी इतकी नुकसान भरपाई शेतकऱ्यांना वितरित होणार आहे. एकूण रु. २५५५ कोटी रकमेचा लाभ राज्यातील ६४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना मिळणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, नुकसान भरपाईची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, असे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले.

युवा आदर्श

### मार्च अखेर ...

मार्चअखेर आला रे
कामे चाले जोमात
चिरीमिरी मिळणारं
आनंद रोमा रोमात
किती हवन करावे
समिधा तूप होमात
हप्ते वाटून दमलेला
कंत्राटदार कोमात
जुनी रखडली बीले
घे मंजुरी एकादमात
दमा दमाने खा बाबू
फुगली तुंडूब जमात
सासरे बुवा खुशीत
गडगंज होतो दामाद
मुलगीभली उजवली
खुशीत नाचे उन्माद
लाल फिती अडवती
उगाचं सगळे भ्रमात
फटा फटा चाले कामे
शिक्के एकेक क्रमात
प्रथमचं पाही बाबूंना
दंगला बा परिश्रमात
वर्षभरजा पुन्हानंतर
आरामात आश्रमात
सारे अख्खे कार्यालय
सामील रे उपक्रमात
नकाकरु इतकीकामे
नोंद होईलं विक्रमात
एक एप्रिल गंमतीचा
नोंद आपली मुर्खात
सरकारी बाबू पुनश्च
निवांत बसवा वर्खात

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# मराठा महासंघाकडून खऱ्या अर्थाने जोपासला जातीय महापुरुषाचा वारसा - इकबाल पाशा

## मराठा महासंघ आयोजित इफ्तार पार्टीत एकता, सौहार्दाचा संदेश

**जालना । प्रतिनिधी** - आजघडीला अनेक राजकीय पक्ष आणि काही संघटना आपला स्वार्थ आणि मतांचे विभाजन करण्यासाठी गलिच्छ राजकारण करून तरुणाईचे माथे भडकावून मतांचे गणित जुळवीत आहे. अशा परिस्थितीत अखिल भारतीय मराठा महासंघ आणि मराठा क्रांती मोर्चा मुस्लिम सम ाजाच्या पवित्र रमजाननिमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन करून जातीय सलोखा अबाधित ठेवण्यासह बंधुभाव, एकता आणि सौहार्दाचा संदेश देत खऱ्या अर्थाने महापुरुषांचा वारसा जोपासण्याचे काम करत आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ सम ाजसेवक इकबाल पाशा यांनी येथे बोलताना केले.

सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने मराठा महासंघाच्यावतीने गुरुवार दि. २७ मार्च रोजी गांधी चमन येथे आयोजित इफ्तार पार्टीत इकबाल पाशा बोलत होते. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, माजी उपनगराध्यक्ष शाह आलम खान, डॉ. संजय लाखे पाटील, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफ ुले, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख माजेद, जमाते इस्लामी हिंदचे शहराध्यक्ष शेख मुजीब, काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख मेहम ूद, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, ओजस हॉस्पिटलचे डॉ. सुरजसिंह तौर, महानगरपालिकेचे अभियंता सय्यद सउद, रमेश देहडकर, पत्रकार अहमद नूर, रमेश जाधव, राजेंद्र जाधव, विजय पवार, दिनकर घेवंदे, कॉम्रेड सगीर अहमद रजवी,ड. राम गव्हाणे, जिल्हा विशेष शाखेचे कैलास जावळे, आमेर पाशा, शेख वसीम, शेख हबीब, वाजेद पठाण, शेख इब्राहिम, ड. अशपाक पठाण, फइम खान आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

### धार्मिक सलोखा राखणारा स्तुत्य उपक्रम - भास्करराव आंबेकर

यावेळी बोलताना भास्करराव आंबेकर म्हणाले की, सद्या राज्यात धार्मिक परिस्थिती तणावाची असताना जालना शहरामध्ये सर्वधम ीय गुण्या-गोविंदाने राहतात. याचे आदर्श उदाहरण म्हणजे मराठा क्रांती मोर्चा व मराठा महासंघ आयोजित इफ्तार पार्टी होय. जालना शहरामध्ये धार्मिक सलोखा राखण्याचे काम मराठा म हासंघ आणि मराठा क्रांती मोर्चा करत आहे.



कार्यक्रमात समाजातील विविध स्तरांतील मान्यवर आणि नागरिकांनी एकत्र येऊन रमजानच्या पवित्र म हिन्याचे महत्त्व अधोरेखित केले व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकपर भाषणात अरविंद देशमुख म्हणाले की, भगवा आणि हिंदुत्वाचे अस्तित्व कायम ठेवून छत्रपती शिवरायांनी दिलेल्या शिकवणीनुसार अठरापगड जाती, धर्म आणि पंथाला सोबत घेऊन जाती व सलोखा कायम ठेवण्यावर मराठा महासंघाचा भर आहे. त्यानुसारच गेल्या दोन वर्षापासून इफ्तार पार्टीचे आयोजन केले जात आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील बंधुभाव अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख जाकीर यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार अशोक पडूळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ड. शैलेश देशमुख, सुभाष चव्हाण, शुभम टेकाळे, अजय कोल्हे, किरण गरड, मंगेश चव्हाण, शेख चांद, संजय देशमुख, फैसल चाऊस, शेख शकील, फईम खान, नितीन अंभोरे, सागर पाटील, शेख गफार, करण जाधव, अजिंक्य शिंदे, सुदर्शन देशमुख, किशोर शिंदे पांडुरंग खैरे, आयुष राठोड, जाकेर खान, मनोज देवरे, बाळासाहेब देशमुख, फिरोज पठाण मराठा महासंघ, मराठा क्रांती मोर्चा, करम ए सैलानी बाबा सेवाभावी संस्था, शेख इब्राहिम मित्र मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

## बहुजन समाज पार्टीच्या जालना जिल्हाध्यक्षपदी सुधाकर निकाळजे

# जिल्ह्यात बसपाची ताकद वाढली, पुढचा महापौर बसपाचा - प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे

**जालना । प्रतिनिधी** - बहुजन समाज पार्टीच्या जालना जिल्हाध्यक्षपदी येथील धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते सुधाकर निकाळजे यांची नियुक्ती शुक्रवार (दि २८) रोजी झाली आहे. बसपाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांनी श्री निकाळजे यांना नियुक्तीचे पत्र दिले असून पक्षात आल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी ॲड. डोंगरे यांनी निकाळजे पक्षात आल्याने बसपाची ताकद जिल्ह्यात वाढली असल्याचे म्हणत जालना शहर महानगर पालिकेचा पहिला महापौर हा बसपाचा होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. ते एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

ॲड. डोंगरे म्हणाले की, आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका या सुधाकर निकाळे यांच्या नेतृत्वात लढविल्या जातील आणि त्या निवडणूकात निकाळजे हे विजयाची तपाका फडकावतील. त्यांच्या नेतृत्त्वा आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांसह विधानसभा व लोकसभा निवडणुकही लढविल्या जाणार आहे. पक्ष संघटन वाढविण्याच्या दृष्टिने बसपा राज्यभरात कार्यरत आहे. तळागाळातील लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यांचे प्रबोधन करणे सुरु आहे. सध्याचे सरकार हे बहुजन विरोधी आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यात बसपाचे अधिकाधिक विधानसभा सदस्य निवडून आणण्याचा मानस असल्याचेही ॲड. डोंगरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी सुधाकर निकाळजे यांच्या नेतृत्त्वात शेकडो कार्यकर्त्यांनी बसपात प्रवेश केला. दरम्यान सुधाकर निकाळजे यांचा सत्कार करुन त्यांना आगामी निवडणूकीच्या अनुषंगाने तयारी करण्याच्या सुचना दिल्या. आगामी निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर बसपाने जालना जिल्ह्यात सुधाकर निकाळजे यांच्या माध्यमातून तयारी केली असून त्यांच्यासाठी आपण स्वतः लक्ष घालून पक्ष वाढ करणार असल्याचेही डोंगरे यांनी सांगीतले. निकाळजे यांचा पुर्वानुभव, त्यांचे नेतृत्व आणि कामकाज पाहता बसपाच्या वतीने त्यांची निवड करण्यात आली. शिवाय ही निवड चांगली असेल आणि त्याचा फायदा बसपला होईल असा आशावादही डोंगरे यांनी व्यक्त केलाय.

यावेळी बसपाचे प्रदेश महासचिव मुकुंद सोनवणे, कोषाध्यक्ष रऊफ भाई, माजी जिल्हाध्यक्ष चंद्रमणी गाडेकर, पुंजाराम खरात, दादाराव लहाने, बाबुराव बोर्डे, रोहीदास गंगातीवरे, म धुकर घेवंदे, अशोक साबळे यांच्यासह इतर पदाधीकारी उपस्थित होते.




## जालना परिवहन विभाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार - प्रताप सरनाईक

**जालना । प्रतिनिधी** - परिवहन विभागाच्या विविध समस्या सोडवण्यासंदर्भात आमदार अर्जुनराव खोतकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पत्र दिले होते. त्यानुसार २६ मार्च रोजी प्रताप सरनाईक मंत्री परिवहन म हाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात बैठक आयोजित केली होती. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आयोजित केलेल्या विशेष बैठकीत जालना परिवहन म हामंडळ, बस सेवा, प्रवासी सुविधा, बस स्थानक विकास, चालक, वाहक सुरक्षा व सुविधा व परिवहन विभागाच्या जालना शहरातील विविध ठिकाणच्या जागेचा विकास व्हावा या विषयासह इतर विषयांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा केली, यावेळी मंत्री महोदयांनी सर्व विषयावर सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच मांडलेल्या समस्यांचे निराकरण करण्याचे सुतोवाच केले. यावेळी परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## भांडवलकरांच्या धनगराचं पोरं कादंबरीला राज्यस्तरीय पुरस्कार

**परतूर । प्रतिनिधी** - परतूर तालुक्यातील प्रा. छबुराव भांडवलकर लिखित कवी भिवराजी आढाव यांची चरित्रात्म क कादंबरी 'धनगराचं पोरं' ला २०२५ सालचा राज्यस्तरीय पुरोगामी साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक,सांस्कृतिक म हासंघाच्यावतीने या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. शनिवारी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात डॉ.ऋषिकेश कांबळे यांच्या हस्ते इतर मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. कवी भिवराजी आढाव यांचा संपूर्ण जीवन प्रवास प्रा. छबुराव भांडवलकर यांनी आपल्या वेगळ्या शैलीतून धनगराचं पोरं या कादंबरीत शब्दबध्द केला आहे. यापूर्वी देखील प्रा.भांडवलकर यांना त्यांच्या इतर साहित्यकृतीसाठी वेगवेगळ्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा.भांडवलकर यांचे समाजाच्या सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.



## संपादकीय

# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली. १९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेले. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# गुढीपाडवा: संपूर्ण सृष्टीसाठी शुभ, समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक

फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते.फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य.हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात. कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे.हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवासण साजरा करतो.आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते.गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच!कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले. त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला.याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला.मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे.अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी,कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो. या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे.या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो.कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दुःख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे. आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत,स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे.हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा.याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे १५ ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो. त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो. गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते. गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी.मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन येते.इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा दाखवून जल्लोष साजरा करण्यात येतो.परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने,आदरतीथ्याने,प्रेमाने,मानसन्माने आणि मुख्यत्वे करून आरोग्याचा दृष्टीकोन सामोरं ठेवुन साजरा करण्यात येतो. त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात जमिन आसमानचा फरक दिसून येतो.वाढते प्रदूषण पहाता सर्वांनीच मास्कचा वापर करावा व आरोग्याची काळजी घ्यावी.महाराष्ट्रासह भारतात वाढते प्रदूषण पहाता व वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे.यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना सावली,मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी दरमहा ५० हजार रुपये देण्याचे उपमुख्यमंत्री यांचे आदेश!

## मंदिरासह सिंधुदुर्ग किल्ला आणि परिसराचा विकास करण्याची मागणी!

**मुंबई -** क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी लाखो रुपये खर्च होत असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी तुटपुंजे अर्थसाहाय्य हा अन्याय आहे, अशी भूमिका हिंदु जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. या मागणीवर उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी महसूल विभागाच्या सचिवांना (श्री शिवराजेश्वर मंदिरासाठी) दरमहा ५० हजार रुपये निधी वाढवून देण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे लिखित आदेश दिले. तसेच महसूल विभागाच्या सचिवांना दूरध्वनी करून मंदिरासाठी दरमहा २५० रुपयांऐवजी ५० हजार रुपये देण्याचे स्पष्ट आदेशही दिले. या वेळी शासनाची मदत मिळण्याआधी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तातडीने वैयक्तिकरित्या महाराजांच्या मंदिरासाठी ५० हजार रुपयांचे साहाय्य करून एक चांगला पायंडाही पाडला. तसेच त्यांनी नियमितपणे मंदिरासाठी निधी घेऊन जाण्यासही सांगितले. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. या प्रसंगी समितीच्या वतीने श्री. सतीश सोनार, श्री. रवि नलावडे आणि नांदेड येथील शिवसेनेचे आमदार श्री. आनंद बोंडारकर उपस्थित होते.

केंद्रात काँग्रेस सरकारच्या काळात वर्ष २०१२ पासून क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी निधी देणे सुरू करण्यात आले होते. नोव्हेंबर २०२३ पर्यंत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ड्ख) विभागाने



औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी ६.५० लाख रुपयांहून अधिक निधी खर्च केला आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार करता औरंगजेब हा एक क्रूर आक्रमक होता. त्याने छत्रपती संभाजी महाराजांवर अमानुष अत्याचार करून निर्घृण हत्या केली. असा आक्रमक आदरास पात्र नाही आणि त्याच्या कबरीच्या देखभालीसाठी निधी खर्च करणे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारे आहे. त्यामुळे हा निधी सरकारने बंद करावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी भरीव निधी द्यावा, अशी मागणी समितीने केली.

**शिवप्रेमींसाठी सिंधुदुर्ग किल्ल्याचा विकास करा!**

छत्रपती राजाराम महाराजांनी स्वत: मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यावर बांधलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे हे एकमेव आणि प्राचीन मंदिर आहे. त्यामुळे येथे लाखो शिवप्रेमी आणि पर्यटक येतात. किल्ल्यावर बोटीने यावे लागते. त्यामुळे येणार्या पर्यटकांची योग्य सोय करणे आवश्यक आहे. किल्ला मोठा असल्यामुळे झाडी-झुडपे मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. त्या हटवून किल्ल्याचे सुशोभीकरण करणे, परिसरात सुंदर बगीचा तयार करणे, पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह आणि गोड्या पाण्याच्या विहिरीचे सुशोभीकरण करणे यांसारखी अनेक विकास कामे तातडीने व्हावीत, अशी मागणी उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

# ई बी के उर्दू विद्यालयातील तीन शिक्षक तालुका स्तरावर सम्मानित

**टेंभूर्णी -** महाराष्ट्र शासनातर्फे शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती २०२४ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध वर्गांचे आणि विविध विषयांचे गट सहभागी झाले होते. या स्पर्धेत तालुका स्तरावर, जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावर बक्षिसे जाहीर करण्यात आली होती. स्पर्धेत राज्यभरातील सुमारे ५,२०,००० शिक्षक सहभागी झाले होते. जाफराबाद तालुका स्तरावर सेठ ई बी के उर्दु विद्यालयाचे तीन शिक्षकांनी ह्या स्पर्धेत सहभाग घेत यश मिळविले. गयास महेमूद शेख समीर मुर्तुजा सय्यद तर साबेरोद्दीन नूरोद्दिन शेख यांन यश मिळविले.

# पोहरागड येथील अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा - जगदीश राठोड

**मंठा । प्रतिनिधी -** बंजारा समाजासह वंचित, उपेक्षित,शेतकरी, ऊसतोड कामगार बांधवांची काशी समजल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पोहरागड येथे ता. ५ एप्रिल, रविवार रोजी अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन सर्व संत महंतांच्या व बंजारा समाजातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आले असून ,समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नेत्रा ग्रुपचे संचालक जगदीश राठोड यांनी केले आहे.



अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला धर्मगुरू आमदार बाबुसिंग महाराज, महंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत रमेश महाराज,महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत खुशाल महाराज, प्रकाश महाराज यांच्यासह भारतभरातून येणाऱ्या प्रमुख बंजारा नेत्यांची उपस्थिती राहणार आहे.

या मेळाव्याला बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड हे मार्गदर्शन करणार असून मागील अनेक वर्षापासून देशपातळीवरील अनेक समस्यांना बंजारा समाज तोंड देत असून त्याकडे शासन प्रशासनाचे लक्ष वेधन्यासाठी तसेच महाराष्ट्रासह आता देशपातळीवर सामाजिक एकजुटीचा निर्णय घेण्याची वेळ आली असल्याने भारतातील १५ कोटी बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरागड येथे अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी महाराष्ट्रासह १३ ते १४ राज्यातील बंजारा बांधवांची उपस्थिती राहणार आहे. या अभूतपूर्व ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने या जनजागृती मेळाव्याला उपस्थित राहण्याचे जगदीश राठोड यांच्यावतीने करण्यात आले आहे




माणगाव तालुक्यात शालेय परिपाठात होतोय संविधानाच्या अंतरंगाचा समावेश

# ‘घर घर संविधान’ ह्या शासननिर्णयाबाबत अनोखा उपक्रम

**बोरघर । माणगांव । प्रतिनिधी** - रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शासनाने पारित केलेल्या 'घर घर संविधान' ह्या निर्णयाची अंमलबजावणी नाविन्यपूर्ण पद्धतीने करण्यात येत आहे. मा. गटशिक्षणाधिकारी आद. सुरेखा तांबट मॅडम यांनी सदर शासननिर्णयात संविधान जनजागृती संदर्भात करण्यात आलेल्या अपेक्षांना नाविन्यपूर्ण उपक्रमांनी केवळ विद्यार्थीच नव्हे, तर त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयांतर्गत माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांची एकदिवशीय 'संविधान कार्यशाळा' घेण्यात आली. त्यात मुख्याध्यापकांना सदर उपक्रमाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

संविधान हे केवळ भाषणातून समजून घेण्याचा विषय नसून तो खरं तर वाचनातून जाणून घेण्याचा विषय असल्याने रोजच्या रोज त्याबाबत वाचन होणे गरजेचे आहे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये होणाऱ्या परिपाठादरम्यान संविधानाविषयी रोजच्या रोज माहीती देण्याबाबत निर्णय मा. गटशिक्षणाधिकारी मॅडम यांनी घेतला. त्यानुसार संविधानाच्या प्रत्येक अनुच्छेदाविषयी साध्या सोप्या भाषेत माहिती संकलित करण्याची जबाबदारी संविधान अभ्यासक असलेल्या नुरखाँ पठाण यांच्यावर सोपवण्यात आली. त्यानुसार 'संविधान म्हणजे काय?' इथून संविधानाविषयी असलेल्या माहीतीचे संकलन करुन त्यातील प्रत्येक अनुच्छेदास मुलांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेत मांडण्यास सुरुवात झाली. ही सर्व माहिती अगदी दोन ते तीन मिनिटांत सांगता येईल, अशा स्वरूपात व्हाट्सअप पोस्ट तयार करण्यात आल्या. सदर पोस्ट माणगाव तालुक्याच्या शासकीय शैक्षणिक गृप वर आदल्या दिवशी नित्यनेमाने पाठवण्यात आल्या. आदल्या दिवशीच संविधानाविषयी माहीती उपलब्ध होत असल्याने तीचे आकलन करून ते दुसऱ्या दिवशी परीपाठात विद्यार्थ्यांना समजावून सांगणे शिक्षक बंधू भगिनींना सहज शक्य झाले. माणगाव तालुक्यात सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये सदर माहिती रोजच्या रोज परिपाठादरम्यान सर्व विद्यार्थ्यांना त्यांना समजेल अशा भाषेत व पद्धतीने सांगितली जाऊ लागली.



शासनाने घरोघरी संविधानिक मूल्ये पोहोचावित, या दृष्टीने 'घर घर संविधान' ह्या नावाने आदेश निर्गमित केलेला आहे. शासनाच्या ह्याच उद्देशाला डोळ्यांसमोर ठेवून परीपाठामध्ये विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात येणारी पोस्ट संबंधित शाळेतील पालकांच्या गृपवर नित्यनेमाने पाठवण्यात येत आहे. त्या पोस्टचे वाचन विद्यार्थी आपापल्या पालकांसमोर करत आहेत. अशा पद्धतीने शाळांच्या माध्यमातून 'घर घर संविधान' पोहोचविणारा आगळा वेगळा उपक्रम माणगाव तालुक्यात राबविण्यात येत असल्याने तो सर्वत्र कौतुकाचा विषय बनलेला आहे. घर घर संविधानाबाबत एक आगळा वेगळा 'माणगाव पॅटर्न' तयार करून तो यशस्वी केल्याबद्दल सर्वच स्तरातून मा. गटशिक्षणाधिकारी आद. सुरेखा तांबट मॅडम व तालुक्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनींचे विशेष कौतुक होत आहे.

जालना समाजकार्य महाविद्यालय व विरा मेडीसिटी हॉस्पिटल यांचा सयुक्त उपक्रम

# मोफत सर्वरोग निदान शिबिर संपन्न



**जालना । प्रतिनिधी** - कर्मवीर प्रतिष्ठान संचलित, जालना समाजकार्य महाविद्यालय रामनगर, जालना व विरा मेडीसिटी हॉस्पिटल जालना यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेत्रकार्य अंतर्गत जळगाव (सो.) येथे दि.२७ मार्च २०२५ रोजी मोफत सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस अभिवादन करून शिबिरास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. नरसिंग पवार यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू वाघमारे यांनी केले. सदरील शिबिरास विरा मेडिसिटी हॉस्पिटलचे डॉ.सुहास विघ्ने, डॉ. प्रवीण सोनवणे, डॉ. तेजस ताठे, डॉ. रोहित दराडे, डॉ. प्रवीण ससाणे, नर्स जोसना हिवाळे या तज्ज्ञांनी एकूण स्त्रि - पुरूष अशा ७३ गावकऱ्यांची आरोग्य तपासणी करून सल्ला दिला. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन प्रा.डॉ. नरसिंग पवार व सामाजिक कार्यकर्ता राजू वाघमारे यांनी केले. यावेळी महविद्यालयातील प्रा.डॉ. मधू खोब्रागडे, प्रा.डॉ.बालाजी मुंडे, प्रा.डॉ.सुधीर गायकवाड, प्रा.डॉ.दिपक बुक्तरे, प्रा.डॉ. रेणुका बडवणे, प्रा.डॉ. मीना बोर्डे प्राध्यापक वृंद उपस्थित होते. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी दिपक राठोड, रोहण राठोड, प्रथम सावंत वैष्णवी भुतेकर, शुभांगी भुतेकर अंगणवाडी सेविका मीना भुतेकर व मदतनीस राधाबाई कंठुले कार्यक्रमास उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे आभार सोमेश गिरी यांनी मानले.




### जेईएस महाविद्यालय दोन दिवसीय क्रीडा व शारीरिक शिक्षण विषयाची राष्ट्रीय परिषदेचे उदघाटन

# युवकांसाठी क्रीडा व शारीरिक शिक्षण क्षेत्रात अनेक रोजगाराच्या संधी - प्रा. डॉ. अंजली ठाकरे

**जालना । प्रतिनिधी -** युवकांसाठी क्रीडा व शारीरिक शिक्षण या क्षेत्रामध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध असून युवकांनी या क्षेत्राकडे वळावे असे प्रतिपादन,शिवाजी महाविद्यालय अमरावती येथील क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. अंजली ठाकरे यांनी जालन्यात जेईएस महाविद्यालयात आयोजित क्रीडा व शारीरिक शिक्षण विषयाच्या राष्ट्रीय परिषदेच्या चर्चासत्रात केले.

जेईएस महाविद्यालयच्या क्रीडा विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर तसेच शारीरिक शिक्षण संस्था नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय क्रीडा व शारीरिक शिक्षण आंतरशाखीय संबंध बाबत राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि.२८ ते २९ मार्च २०२५रोजी करण्यात आले असून, उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षपदी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम बगडिया हे होते, तर प्रमुख पाहुणे अमरावती येथील शिवाजी महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ. अंजली ठाकरे, व संस्थेचे उपाध्यक्ष श्री फुलचंद भक्कड , डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा विभाग संचालक प्रा. डॉ संदीप जगताप, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे क्रीडा संचालक प्रा.डॉ. सिंकू कुमार सिंग, हे व्यासपीठावर नाशिक येथील योगशिक्षक प्रा.नरवडे ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख डॉ.हेमंत वर्मा यांनी केले असून महाविद्यालयात तिसरी राष्ट्रीय परिषद व चर्चासत्र असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास व परंपरा सांगितली असून ,या महाविद्यालयात अनेक राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू होऊन गेल्याचे सांगून, आर्चरी या खेळात दरवर्षी चार-पाच खेळाडू राष्ट्रीय स्तरावर कामगिरी यशस्वीपणे करत असल्याचे सांगितले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी क्रीडा मार्फत सर्व खेळांसाठी सुविधा उपलब्ध करून देऊ असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना प्राध्यापिका डॉक्टर अंजली ठाकरे म्हणाल्या की आज क्रीडा व शारीरिक शिक्षण या विषयांमध्ये रोजगाराच्या मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत क्रीडा क्षेत्रात पत्रकारिता करू शकतात तसेच मार्गदर्शक कोच उत्कृष्ट खेळाडू म्हणूनही नावलौकिक कमवू शकतात त्याचबरोबर फिजिओथेरपीसचेही कार्य करू शकतात .क्रीडा स्पर्धांचे व्यवस्थापनाचे कार्यही करू शकतात. खाजगी जिम व व्यायाम शाळा काढू शकतात.देश विदेशात अनेक रोजगार खेळाडूंना उपलब्ध आहेत, असेही डॉ. अंजली ठाकरे यांनी सांगितले. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे क्रीडा विभाग प्रभारी संचालक डॉ.संदीप जगताप व नांदेड स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शंकू कुमारसिंग यांनी आपले मनोगत व्यक्त केलेत. अध्यक्ष समारोप करताना श्री. पुरुषोत्तम बगडिया म्हणाले की जेइएस महाविद्यालयात वेगवेगळे खेळ खेळले जात असून, खेळासाठी कुठल्याही प्रकारचा निधी कमी पडणार




नाही,त्याची सुविधा आम्ही उपलब्ध करून देऊ. खेळाने मानवी शरीर तंदुरुस्त असते ,असेही श्री बगडिया यांनी सांगितले.

या राष्ट्रीय परिषदेत घनसांगवीचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा डॉ. बप्पा मस्के, भोकरदन चे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ.रोकडे, प्रा. डॉ.चंद्रशेखर, जेईएस महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय परिषदेत सहभागी खेळाडू व क्रीडा शिक्षक, योगा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका भाग्यश्री बियाणे यांनी केले तर उपस्थिताचे आभार प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी मानलेत. ही राष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. किशोर बिरकायलू, प्रा. राहुल सारस्वत, डॉ. प्रवीण चंदनशिवे, सेवक विलास बोधले, धर्मेंद्र आंबट, श्री साईनाथ आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## मानव सेवाच्या इफ्तार पार्टीने सामाजिक बांधिलकी जपली -खामगळ



**दत्ता देशमुख**
**टेंभुर्णी -** येथील जुन्या बस स्थानक येथील मस्जिद मध्ये या वर्षी ची पहिली इफ्तार पार्टी आयोजित करून टेंभुर्णी येथील भाईचाराचा संदेश या वेळी मानव सेवा कडून देण्यात आला.

या वेळी या इफ्तार पार्टी साठी मानव सेवा चे प्रांत अध्यक्ष कृषी भूषण श्री नंदकिशोर काबरा यांची प्रमुख उपस्थिती होती.त्यांच्या सोबत या वेळी सरपंच प्रतिनिधी गौतम म्हस्के यांच्यासह पोलीस निरीक्षक सचिन खामगळ मानव सेवा चे प्रांत सचिव शेख नसीम सर ज्येष्ठ समाज भूषण पीजी तांबेकर सर माजी ग्रामपंचायत सदस्य मोइन भाई बागवान भिकन पठाण माजी सरपंच लक्ष्मण शिंदे विष्णू जमधडे माजी उपसरपंच फैसल चौऊस उपसरपंच शिवाजी शिंदे यांच्यासह मानव सेवा मंडळाचे स्थानिक शाखाचे अध्यक्ष संजय राऊत सचिव अलकेश सोमानी, माजी सुभेदार पी के वाघमारे, संतोष शिंदे,दत्तातेय मुनेमानिक, गोविंद जाधव, साई बोर्डे, भागाजी वाघमारे,रावसाहेब अंभोरे, बालू मगर,शैलीप्रकाश वाघमारे,भिका मामा, मुकुंदराव औटी, रविंद्र उखर्डे, प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राची जाफराबाद तालुका अध्यक्ष शेख अशपाक भाई ,अशोक पाबळे, शेख ताहेर,शेख फकरू मुस्ताक बागवान, शेख अब्दुल नबी, शेख मजीद भाई, शेख सादिक, शेख जुमान, सुनील अंभोरे यांच्यासह अनेक हिंदू मुस्लिम बांधव यावेळी उपस्थित होते या छोट्या खाणी कार्यक्रमात कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उर्दू शिक्षक शेख साबेर यांनी केले यावेळी आपल्या भाषणातून सांगताना येथील ठाणे प्रमुख सचिन खामकर यांनी सांगितले की सोशल मीडियाच्या नादात तरुण मंडळी मोठी गुरफाटल्या गेली असल्या कार्यक्रमाने चांगला मेसेज जाऊन एक चांगला प्रभाव पडेल असे सांगून आयोजीत केलेल्या कार्यक्रम बद्दल मानव सेवा मंडळाचे त्यांनी आभार मानले व टेंभुर्णी सारख्या लहान गावात मानव सेवा यांच्या काम पाहून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली असे सांगितले.. अश्या कार्यक्रमाची सध्या गरज असून या कार्यक्रमातून भाई चारा चांगला होईल अशी अशा व्यक्त करून सगळे सण येथे चांगले साजरे होतात गुण्यागोविंदाने साजरे होतात हे चांगले,अशी आपली भावना श्री सचिन खामगळ यांनी व्यक्त केली.यावेळी संजय राऊत शेख साबेर सर आणि गौतम म्हस्के पी जी तांबेकर यांनी समायोजित भाषणे केली.

### उद्या 'दु:खी' व ना.धों.महानोर पुरस्काराचे वितरण

## कवितेचा पाडवा; काव्यमैफल, चित्रप्रदर्शन त्रिवेणी संगम

**जालना । प्रतिनिधी -** स्व. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि अनुभव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गुढीपाडव्यास प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही साहित्याची गुढी उभारली जाणार असून रविवारी ( ता.३०) सायंकाळी ७.०० वा. जे. ई. एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात दु:खी राज्य काव्य आणि ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्काराचे वितरण, प्रसिद्ध चित्रकारांच्या चित्रांचे प्रदर्शन व नामवंत कवींची काव्यमैफल अशा त्रिवेणी संगमाची पर्वणी रसिकांना अनुभवता येणार आहे.

सुप्रसिद्ध उर्दू शायर राय हरिश्चंद्र साहनी ऊर्फ ' दु:खी ' यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मराठी कवितेतील समग्र योगदानासाठी दु:खी राज्य काव्य पुरस्कार मागील २७ वर्षांपासून वितरित केला जातो.आतापर्यंत मराठी साहित्य विश्वातील अनेक दिग्गजांना सदर पुरस्काराने गौरविण्यात आले असून अनेक प्रख्यात कवींनी कवितेच्या पाडव्यात हजेरी लावत आपल्या कवितांचे सादरीकरण केलेले आहे. भरगच्च रसिकांचा प्रतिसाद हे वेगळे वैशिष्ट्य असलेल्या देखण्या सोहळ्याचे हे




२७ वे वर्ष असून संयोजकांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही वेगळे स्वरूप देत ' कवितेच्या पाडव्या ' ची अभिनव रचना केली आहे.

लासलगाव येथील शेतकरी असलेले कवी -गीतकार प्रकाश होळकर यांना दु:खी राज्य काव्य पुरस्कार रोख पंचवीस हजार रूपये तर कोल्हापूर येथील ज्येष्ठ लेखक रफीक सूरज यांना ना. धों. महानोर राज्य साहित्य पुरस्कार रोख दहा हजार रूपये , शाल व सन्मानचिन्ह स्वरूपात प्रसिद्ध साहित्यिक महावीर जोंधळे (पुणे) यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण केले जाईल. उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ हे उपस्थित राहणार आहेत.

पुरस्कार वितरणानंतर रफीक सूरज, प्रकाश होळकर, लता ऐवळे(सांगली),सुनील उबाळे (छ. संभाजीनगर) या निमंत्रित कवींची काव्यमैफल रंगणार असून रवींद्र मगर (छ.संभाजीनगर) हे निवेदन करतील. कार्यक्रम स्थळी प्रसिद्ध चित्रकार स्वप्निल रगडे (बीड) ,सागर जैन व सुशील करनाडे (जालना) यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरवले जाणार आहे.

रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कै. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्टचे विनीत साहनी, अभय साहनी, अनुभव प्रतिष्ठान च्या डॉ. संजीवनी तडेगावकर, पंडितराव तडेगावकर यांनी केले आहे.

## रोजगार मेळाव्याचे आयोजन

**जालना -** जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना आणि मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अंकुशराव टोपे महाविद्यालय,जालना यांचे संयुक्त विद्यमाने शुक्रवारदि. ४ एप्रिल, २०२५ रोजी मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अंकुशराव टोपे महाविद्यालय, सिरसवाडी रोड, रेल्वे उड्डाण पुलाशेजारी, जालना येथे सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंतपंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा तसेच मुख्यंमंत्री युवा कार्य प्रशिक्षण भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२४८२-२९९०३३ या दूरध्वनीवर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा किंवा क्षरश्रपरीक्षसरीसारळश्र.ले या ई-मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी जवळपास १५० पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध होणार आहेत. तरी या मेळाव्याचा बेरोजगार उमेदवारांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## आयुष्मान भारत योजनेचे कार्ड लाभार्थींनी काढून घ्यावे - सुदर्शन राऊत

**दत्ता देशमुख**
**टेंभुर्णी -** आर्थिक स्थिती बेताची असणाऱ्या कुटुंबात एखाद्याला दुर्धर आजार झाला तर त्यावरील खर्च त्यांना परवडत नाही. ही बाब पाहता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शहा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री व ओमप्रकाश शेटे आयुष्यमान भारत महाराष्ट्र राज्य अध्यक्ष व सतीश घाटगे यांच्यावतीने एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचे कार्ड काढल्यानंतर संबंधितांना मोफत उपचाराचा लाभ मिळणार आहे.



एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत जालना जिल्ह्यात १८ लाख १६ हजार लाभार्थी आहेत. पैकी सहा लाख ३६ हजार लाभार्थ्यांनी हे कार्ड काढून घेतले आहे.

जिल्ह्यातील कार्ड काढणाऱ्या नागरिकांचे प्रमाण हे राज्याच्या तुलनेत ३५ टक्के असून, जिल्हा यात १९ व्या क्रमांकावर आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी हे कार्ड काढून घ्यावे, यासाठी सुदर्शन राऊत आयुष्यमान भारत समिती तालुकाध्यक्ष सर्व नागरिकांनी आयुष्यमान कार्ड काढाव आयुष्मान भारत कार्डसाठी केवायसी करण्यात आलेल्या लाभार्थींची संख्या ६ लाख ३५ हजार इतकी आहे. उर्वरित लाभार्थीनी आयुष्मान कार्ड काढून घ्यावे, यासाठी सुदर्शन राऊत आयुष्यमान भारत समिती तालुका अध्यक्ष आयुष्मान भारत योजनेंतर्गत लाभार्थी असणाऱ्या नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढून घ्यावे, यासाठी सुदर्शन राऊत आयुष्यमान भारत समिती तालुका अध्यक्ष यांनी कार्डचे महत्त्व नागरिकांना पटवून देत आहेत.

**उद्दिष्ट १८ लाख कार्डांचे**

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना लाभार्थी १८ लाख १६ हजार आहेत. सर्व लाभार्थींनी आयुष्मान कार्ड काढून घ्यावे, यासाठी जनजागृती केली जात आहे. शिवाय जिल्हा रुग्णालय ते प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांतर्गत कार्यक्रमांमध्येही मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे.

**१३५६ योजनेत समावेश**

आयुष्मान कार्ड असेल तर संबंधित कुटुंबातील व्यक्ती आजारी पडल्यानंतर तब्बल १३५६ आजारांवर मोफत उपचार, शस्त्रक्रिया शासकीय योजनेतून केली जाते.

**कोठे काढणार कार्ड?**

सीएससी सेंटर किंवा आपले सस्कार सेवा केंद्रावर जाऊन आयुष्मानचे कार्ड नागरिकांना काढता येणार आहे. यासाठी रेशनकार्ड, आधार कार्ड, २ आदी विविध कागदपत्रांसह मोबाइल क्रमांकाद्वारे नोंदणी करणे गरजेचे आहे. मोबाइलवर ओटीपी आल्यानंतर आयुष्मान कार्डची पुढील प्रक्रिया पूर्ण करता येते. त्यानुसार आजवर जिल्ह्यातील सहा लाख ३६ हजारांवर नागरिकांनी आयुष्मानचे कार्ड काढून घेतले आहे.

**३८ नोंदणीकृत दवाखाने**

आयुष्मान भारत कार्ड असणाऱ्या लाभार्थीना या योजनेंतर्गत नोंदणीकृत असणाऱ्या शासकीय, खासगी ३८ रुग्णालयात १३५६ आजारांवर मोफत शस्त्रक्रिया, उपचार घेता येणार आहेत. त्यासाठी कार्ड काढणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी हे कार्ड काढून घ्यावे, यासाठी सुदर्शन राऊत आयुष्मान भारत समिती अध्यक्ष प्रयत्न केले जात आहेत. हे कार्ड काढून घेण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेणे तितकेच गरजेचे असल्याचे सुदर्शन राऊत यांनी सांगण्यात आले. आयुष्मान भारत योजनेचे कार्ड लाभार्थीनी काढून घ्यावे, सुदर्शन राऊत आयुष्यमान भारत समिती तालुकाध्यक्ष यासाठी जनजागृती केली जात आहे. आजवर जिल्ह्यातील सहा लाखांवर लाभाव्यांनी हे कार्ड काढून घेतले आहे.

## सनी गायकवाड समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**परतुर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र मध्ये फुले शाहू आंबेडकर साठे चळवळीत काम करणाऱ्या सर्व सामाजिक कार्यकर्ते यांना महाराष्ट्रातील सर्वांचे परिचित भंते कश्यप ली यांच्यावतीने दिनांक ३० मार्च २०२५ रोजी वार रविवार या दिवशी पारेगाव तालुका जिल्हा जालना येथे दोन दिवसीय धम्म परिषदेच्या औचित्य साधून त्या रोजी सनी गायकवाड यांना समाजाप्रती प्रामाणिक काम केल्याबद्दल तसेच फुले शाहू आंबेडकर चळवळीत व सन ऑफ आंबेडकर ग्रुप परतुर च्या वतीने विविध गोरगरीब वंचित घोषित घटकातील नागरिकांचे कामे मार्गे लावल्याबद्दल तसेच समाजासाठी अहो रात्र झटकल्याबद्दल त्यांना भंते कश्यप ली यांच्या हस्ते समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



यावेळेस सनी गायकवाड यांना विचारणा केली असता त्यांनी सर्वात आगोदर आदरणीय भन्ते कश्यप ली यांचे मनापासून आभार मानले,तसेच हा समाजरत्न पुरस्कार घोषित झाल्यानंतर त्यांनी पुढे असे म्हटले मानसन्मान हा विकत घेता येत नसतो समाजाप्रती ग्राउंड लेव्हल ला काम केल्यानंतर नक्कीच असे सन्मान मिळत असतात यापुढेही समाजाप्रती तसेच बाबासाहेबांच्या चळवळीसाठी रात्रंदिवस निस्वार्थी काम करण्याचे बळ मिळालं आहे यापुढेही चळवळीचे काम जोमात करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अध्यक्षस्थानी गुड्डू माघाडे, सचिव पदी गौतम छडीदार

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त २०२५ समितीची निवड करण्यात आली असून यात अध्यक्षपदी प्रदीप (गुड्डू) मघाडे, उपाध्यक्षपदी दीपक शिंदे, तर सचिव पदी गौतम छडीदार यांची निवड करण्यात आली आहे. उर्वरित कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी गौतम म्हस्के, कोषाध्यक्ष प्रदीप काकडे, सहकोषाध्यक्ष राहुल कांबळे आदींचा समितीत समावेश आहे. यावेळी सरपंच गौतम म्हस्के, मा. जि. सदस्य. किसनराव मघाडे, प्रा. भिवसन ससाणे, प्रा. प्रकाश वाघमारे, डॉ. सतीश चंदनशिवे, दशरथराव मघाडे, जगनदादा मघाडे, रणजित जाधव, शालिकराम काकडे, दिगंबर भिसे,गणेश म्हस्के, विजय वरशीळ, मिलिंद म्हस्के,







देवानंद साळवे, विश्वनात मघाडे, वसंता छडीदार, शेषराव मघाडे, सुरेश हिव्हाळे, विलास पैठणे, लहू मघाडे, एकनाथ मघाडे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. समिती सदस्यपदी संतोष मघाडे,भीमराव म्हस्के सूर्यप्रकाश मघाडे,समाधान मघाडे,प्रकाश साबळे, किशोर शेजूळ,धम्मा आढावे, शरद मघाडे, राहुल दांडगे, प्रशांत शिंदे,विकास पैठणे,कपिल जाधव, विनोद काळे ,विजय म्हस्के,दिनेश साबळे, राजू गवई, रवींद्र भिसे, किरण कासारे,विशाल गवई,नवनाथ मघाडे, सुनील मघाडे, गौतम गायकवाड, सोमेश मघाडे, संदीप भिसे, आकाश चंदनशिवे, राकेश जाधव,स्वराज वरशीळ,शुभम मोरे,नितीन पैठणे,प्रीतम बनसोडे, सोनू पैठणे, विनोद शेजूळ, राहुल गायकवाड, प्रेम हिव्हाळे, भारत मघाडे, आनंद जाधव, विशाल हिव्हाळे, सचिन चंदनशिवे, शिवा छडीदार, उदयाण साळवे, निखिल काकडे, अनिल म्हस्के, सुनील मघाडे, समाधान छडीदार, गौतम कांबळे, अनिल गायकवाड, राहुल जाधव, आर्यन मघाडे, सुनील गाडेकर, मंजिराम काळे, अशोक मघाडे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.